# नव भारत निर्मितीसाठी तरुणांनी योगदान द्यावे

## राज्यपाल कोश्यारी यांची अपेक्षा

लोकसत्ता प्रतिनिधी

**सोलापूर :** पदवीधर तरुण पिढीने मनाशी मोठा संकल्प करावा आणि निश्चित ध्येय डोळ्यासमोर ठेवून सदाचाराने आत्मनिर्भरतेकडे वाटचाल केली तर नवा भारत निर्माण होईल, असे मत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी व्यक्त केले.

सोमवारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा सोळावा दीक्षान्त समारंभ ऑनलाईन पद्धतीने पार पडला. यामध्ये राजभवनवरून या कार्यक्रमात ऑनलाईन सहभागी होत राज्यपाल कोश्यारी बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस होत्या. या प्रसंगी माजी मंत्री तथा आमदार सुभाष देशमुख, प्र-कुलगुरू डॉ. देवेंद्रनाथ मिश्रा, प्रभारी कुलसचिव डॉ. विकास घुटे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी दीक्षान्त मिरवणूक निघाली. यात परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक श्रेणिक शाह हाती ज्ञानदंड घेऊन सहभागी झाले होते.

राज्यपाल कोश्यारी म्हणाले,की महात्मा गांधी, विनोबा भावे यांनी स्वावलंबनाचा विचार दिला. त्या अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला आत्मनिर्भर करा, असे आवाहन केले आहे. त्यानुसार आत्मनिर्भरतेचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून नवे संशोधन करण्याचा प्रयत्न तरुणांनी करावा. यातून विद्यापीठाचे आणि देशाचे नाव उज्ज्वल करावे असे आवाहन त्यांनी केले. स्थलांतर रोखण्यासाठी विद्यापीठाने रोजगार निर्मितीवर भर द्यावा, अशी अपेक्षा आमदार सुभाष देशमुख यांनी व्यक्त केली.

या वेळी प्रातिनिधिक स्वरूपात चार विद्यार्थ्यांना सुवर्णपदके तर चार विद्यार्थ्यांना पीएच. डी. पदव्यांचे वितरण झाले. चारही विद्याशाखेच्या अधिष्ठातांनी स्नातकांना सादर केल्यानंतर कुलपती कोश्यारी यांनी विद्यार्थ्यांना पदवी प्रदान केली. याचबरोबर या वेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा यंदाचा जीवनगौरव पुरस्कार बार्शी येथील डॉ. बबन यशवंतराव तथा बी. वाय. यादव यांना शैक्षणिक, सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल देऊन सन्मानित करण्यात आले. रोख ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह व गौरवपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते. याशिवाय अन्य काही पुरस्कारही वितरित करण्यात आले. यात उत्कृष्ट शैक्षणिक संस्था पुरस्कार– शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज,उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार-के. एन. भिसे, आर्ट्स, कॉमर्स अॅन्ड विनायकराव पाटील सायन्स कॉलेज, कुर्डूवाडी, उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार - प्राचार्य, डॉ. बब्रुवाहन पांडुरंग रोंगे, कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, पंढरपूर, उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार-डॉ. विष्णू पांडुरंग शिखरे, कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी, उत्कृष्ट शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार- कैलास वसंतराव देशमुख, प्रबंधक यशवंतराव चव्हाण महाविद्यालय करमाळा यांचा समावेश होता.

# 'स्वयं अर्थसाहाय्य' मधील प्राध्यापकांना सातवा वेतन

## व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत निर्णय

**सकाळ वृत्तसेवा**



कोल्हापूर, ता.२२ : शिवाजी विद्यापीठात स्वयं अर्थसाहाय्यावर चालणाऱ्या अभ्यासक्रमांमधील प्राध्यापकांना सातवा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेने घेतला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली आज बैठक झाली. विद्यापीठातील संगणकशास्त्र अधिविभागात पी. जी. डिप्लोमा इन डाटा सायन्स हा नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याचाही निर्णय घेण्यात आला. मागील वर्षात न झालेल्या परीक्षा फी विद्यार्थ्यांना परत देण्याविषयी चर्चा झाली. कायम विनाअनुदानित महाविद्यालयांना आर्थिक मदत व संगणक केंद्र आढावा घेण्यासाठी समिती नेमण्यात आली. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांचे ॲकेडेमिक ऑडिट क्लस्टर तयार करून परीक्षण करण्याचे नियोजन करण्यात आले.

# विद्यापीठात आज ऑनलाईन राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ नेहरू अभ्यास केंद्र व राज्यशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार (दि. २३) रोजी 'पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कृषी धोरणांची प्रस्तुतता' या विषयावर ऑनलाईन राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. 'पंडित जवाहरलाल नेहरू पूर्व काळातील कृषी धोरण व २०२० चा कृषी कायदा' याविषयावर प्रा.डॉ.पी.एस.कांबळे, 'पंडित जवाहरलाल नेहरू काळातील कृषी धोरण' विषयावर प्रा.डॉ.भारती पाटील, 'पंडित जवाहरलाल नेहरू उत्तर काळातील कृषी धोरण' या विषयावर नाशिकचे प्राचार्य डॉ.पी.डी. देवरे, 'पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कृषी धोरणांची समकालीन उपयुक्तता' विषयावर प्रा.डॉ. प्रकाश पवार मार्गदर्शन करणार आहेत. चर्चासत्राचा लाभ घेण्याचे आवाहन राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. रवींद्र भणगे यांनी केले आहे.

# विद्यापीठ संगणकशास्त्र अधिविभागात नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील संगणकशास्त्र अधिविभागात पी. जी. डिप्लोमा इन डाटा सायन्स नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यास व्यवस्थापन परिषेदच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. मागील वर्षात न झालेल्या परीक्षा फी विद्यार्थ्यांना परत देण्याच्या विषयावर चर्चा झाली. व्यवस्थापन परिषदेची बैठक सोमवारी झाली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. सचिव म्हणून कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते. बैठकीत विविध विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. विद्यापीठातील सेल्फ सपोर्टिंग कोर्सच्या प्राध्यापकांना सातवा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय झाला. कायम विनाअनुदानित महाविद्यालयांना आर्थिक मदत व संगणक केंद्र आढावा घेण्यासाठी समिती नेमण्यात आली. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांचे ॲकेडमिक ऑडिट करण्यासाठी क्लस्टर तयार परीक्षण करण्याचे नियोजन करण्यात आले.



# पीजी डिप्लोमा इन डाटा सायन्स अभ्यासक्रमाला मान्यता

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात १० मार्च रोजी होणाऱ्या अधिसभेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरे तयार करुन, सादर करण्यास मंजुरी देण्यात आली. विद्यापीठातील संगणकशास्त्र अधिविभागात २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात पी. जी. डिप्लोमा इन डाटा सायन्स नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. यासह अन्य निर्णय सोमवारी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. सचिवपदी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते.

शिवाजी विद्यापीठात स्वनिधितुन निर्माण करण्यात आलेल्या शिक्षकांना तसेच युजीसी रिसर्च सायंटिस्ट, सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र, अप्लायड, स्टॅस्टिक, तंत्रज्ञान अधिविभाग व इतर योजने अंतर्गत तंत्रज्ञान अधिविभागातील प्राध्यापकांना शासन निर्णय लागू करण्यासाठी समिती पुनर्गठीत करण्याचा अहवाल स्विकारला. विद्यापीठातील सर्व सेल्फ सपोर्ट अभ्यासक्रमाच्या प्राध्यापकांना सातव्या वेतन आयोगानुसार वेतन देण्याचा निर्णय घेण्यात आला.